# हिंदी विभाग अहवाल

## शै.वर्ष (2018- 19)

मानवी मूल्यांचे संवर्धन करणारे साहित्य वर्तमानात आवश्यक आहे.संवाद होण्यासाठी साहित्य महत्त्वाचे साधन असते. तसेच साहित्य हा समाजाचा आरसा असून समजातील उपेक्षित घटकांच्या भावना साहित्यातून अभिव्यक्त होणे काळाची गरज आहे.असे झाले तरच साहित्य अधिक प्रगल्भ असु शकते असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य व शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय नळेगावं येथील हिंदी विभागाध्यक्ष डॉ. बालाजी भुरे यांनी केले.

येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी हिंदी साहित्य मंडळाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम सोळंके व प्रा.डॉ. बालाजी भुरे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य मंडळाच्या अध्यक्षस्थानी श्री चंद्रकांत फड,उपाध्यक्षपदी श्री कुणाल चालीकवार,सचिव शेख नाजीमा, कोषाध्यक्ष आयशाराहिन पांढरे तर सदस्यपदी दिपक बोदंर ,सुजानबानो हन्नूरे,अदिती पाटील, कोमल उंबरे, माया वाघमोडे,ऋतिक ओझा यांची निवड करण्यात आली. महाविद्यालयातिल विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित व्हावी आणी त्यांच्या मनात साहित्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात हिंदी साहित्य मंडळाची स्थापना करण्यात आल्याचे मत हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. साईनाथ उमाटे यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके म्हनाले की, भाषा हा साहित्य, समाज व संस्कृति यांना जोडणारा दुवा आहे.या भाषेवर विद्यार्थ्यांनी नितांत प्रेम करावे.त्यासोबत विद्यार्थ्यांनी विविध कलांचा आस्वाद घेऊन स्वतःला सिद्ध केले पाहिजे.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिष तिवारी तर आभार शेख सालेहा यांनी केले.यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**हिंदी विभाग प्रमुख**

प्र. प्राचार्य
**I/C. Principal**
Dayanand College of Commerce
LATUR


दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर
हिंदी विभाग
हिन्दी वाड्मय मंडळ उद्‌घाटन
एवं
हिन्दी
सप्ताह समारोह
अध्यक्ष
प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके
प्रमुख अतिथि
डॉ. बालाजी भुरे






पुण्य नगरी
शनिवार, २९ सप्टेंबर २०१८

# उपेक्षित घटकांच्या भावना साहित्यातून अभिव्यक्त व्हाव्यात : डॉ. भुरे

**लातूर/ प्रतिनिधी**

मानवी मूल्यांचे संवर्धन करणारे साहित्य वर्तमानात आवश्यक आहे. संवाद होण्यासाठी साहित्य महत्त्वाचे साधन असते. साहित्य हा समाजाचा आरसा असून, समाजातील उपेक्षित घटकांच्या भावना साहित्यातून अभिव्यक्त होणे काळाची गरज आहे, असे झाले तरच साहित्य अधिक प्रगल्भ असू शकते, असे प्रतिपादन नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाचे हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. बालाजी भुरे यांनी येथे केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. हिंदी साहित्य मंडळाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके, प्रा. डॉ. भुरे यांच्या हस्ते झाले. यावेळी साहित्य मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत फड, उपाध्यक्षपदी कुणाल चालीकवार, सचिव नाजिमा शेख, कोषाध्यक्ष आयशाराहिन पांढरे, सदस्यपदी दीपक बोंदर, सुजानबानो हन्नुरे, अदिती पाटील, कोमल डंबरे, माया वाघमोडे, ऋतिक ओझा यांची निवड करण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित व्हावी आणि त्यांच्या मनात साहित्याची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयात हिंदी साहित्य मंडळाची स्थापना केली, असे हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. साईनाथ उमाटे यांनी प्रास्ताविकातून स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. सोळंके म्हणाले, भाषा हा साहित्य, समाज व संस्कृतीला जोडणारा दुवा आहे. या भाषेवर विद्यार्थ्यांनी नितांत प्रेम करावे. त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी विविध कलांचा आस्वाद घेऊन स्वतःला सिद्ध केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी उपस्थितांची भाषणे झाली. सूत्रसंचलन अतिष तिवारी तर आभार सालेहा शेख यांनी मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

शनिवार, २९ सप्टेंबर २०१८

# उपेक्षित घटकांच्या भावना साहित्यातून व्यक्त व्हाव्यात

लातूर/प्रतिनिधी : मानवी मूल्यांचे संवर्धन करणारे साहित्य वर्तमानात आवश्यक आहे. संवाद होण्यासाठी साहित्य महत्त्वाचे साधन असते. तसेच साहित्य हा समाजाचा आरसा असून समजातील उपेक्षित घटकांच्या भावना साहित्यातून अभिव्यक्त होणे काळाची गरज आहे.असे झाले तरच साहित्य अधिक प्रगल्भ असु शकते असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या हिंदी अभ्यास मंडळाचे सदस्य व शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय नळेगाव येथील हिंदी विभागाध्यक्ष डॉ. बालाजी भुरे यांनी केले. येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी हिंदी साहित्य मंडळाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम सोळंके व प्रा.डॉ. बालाजी भुरे यांच्या हस्ते करण्यात आले. साहित्य मंडळाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत फड, उपाध्यक्षपदी कुणाल चालीकवार, सचिव शेख नाजीमा, कोषाध्यक्ष आयशाराहिन पाढरे तर सदस्यपदी दिपक बोदर, सुजानबानो हन्नूरे, अदिती पाटील, कोमल उबरे, माया वाघमोडे, ऋतिक ओझा यांची निवड करण्यात आली.

महाविद्यालयातिल विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित व्हावी आणी त्यांच्या मनात साहित्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात हिंदी साहित्य मंडळाची स्थापना करण्यात आल्याचे मत हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. साईनाथ उमाटे यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. श्रीराम सोळंके म्हनाले की, भाषा



हा साहित्य, समाज व संस्कृति यांना जोडणारा दुवा आहे.या भाषेवर विद्यार्थ्यांनी नितांत प्रेम करावे.त्यासोबत विद्यार्थ्यांनी विविध कलांचा आस्वाद घेऊन स्वतःला सिद्ध केले पाहिजे.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिष तिवारी तर आभार शेख सालेहा यांनी केले.यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

P